महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
शुक्रवार दि. १३ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३४०
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## भल्या पहाटेच्या सुमारास...

# जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**बीड । प्रतिनिधी**

**बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यातील गुटखा, मटका, गांजा, अवैध दारू सह इतर सर्वच अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी ठाणे प्रमुखाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी बीड शहरात काही ठिकाणी चोरीछुपे पत्त्याचे क्लब सुरु असून याकडे स्थानिक पोलीस मात्र दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसत आहे.**



## २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड शहरातील किल्ला मैदान परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धाड टाकून दहा जुगाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून मोबाईल, रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बीड शहरातील किल्ला मैदान येथील परिसरातील मोकळ्या जागेत 'तिर्रट' नावाचा जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. बल्लाळ यांच्या पथकाने आज पहाटे १.१५ वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी आरोपींकडून मोबाईल फोन, रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा २ लाख १८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ राख यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद शहंशाह हे करत आहेत.

## घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर

# शहरातील तीन हॉटेलवर छापा



**बीड । प्रतिनिधी**

इराण-इजराइल-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्वयंपाकाच्या गॅसची संभाव्य टंचाई लक्षात घेता घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर पुरवठा विभागाने कारवाई सुरू केली आहे. बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील तीन हॉटेलवर छापा टाकून घरगुती गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. फक्त नगर रोडवरील हॉटेल कारवाई करण्यात आल्याने पुरवठा विभागाच्या कारवाईवर संशय व्यक्त केला जात आहे. घरगुती गॅस सर्वसामान्य ग्राहकांना उपलब्ध व्हावा यासाठी केंद्र सरकारने कठोर पावले उचलत व्यावसायिक वापरावर निर्बंध आणले आहेत. मात्र बीडमध्ये अनेक हॉटेल, खानावळ व धाब्यांमध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास वापर होत असल्याचे चित्र आहे. याच पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील ▶▶ पान २ वर

# वनविभागाचे कृत्रिम पाणवठे कोरडेठाक



**बीड । प्रतिनिधी**

उन्हाचा पारा वाढत असतानाच बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्रात वन्यजीवांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वनविभागाने तयार केलेले कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने हरिण, मोर, वानर यांसारखे वन्यप्राणी पाण्यासाठी आता मानवी वस्त्यांकडे आणि गावतलावांकडे धाव घेत आहेत. यामुळे वन्यजीवांचे प्राण धोक्यात आले असून वनविभागाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. करचुंडी वनक्षेत्रांतर्गत येणाऱ्या बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी आणि सोमनाथवाडी परिसरात वनविभागाने अनेक कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. मात्र, कडक उन्हामुळे हे पाणवठे कोरडेठाक पडले आहेत. ज्या ठिकाणी पाणी शिल्लक आहे, तिथे महिनाभरापासून पाणी बदलले नसल्याने मोठ्या प्रमाणात शेवाळ साचले आहे. हे अस्वच्छ पाणी प्राण्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहे. ▶▶ पान २ वर

# 'पीएम-किसान'चा हप्ता आज होणार जमा!

## राज्यातील ९१ लाख शेतकऱ्यांना दिलासा!

**मुंबई । वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. १३) 'पीएम-किसान' सन्मान निधी योजनेचा २२ वा हप्ता वितरित करण्यात येणार आहे. आसाममधील गुवाहाटी येथे सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या मुख्य कार्यक्रमानंतर राज्यातील ९१ लाख १९ हजार पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही मदत जमा होईल. या हप्त्यापोटी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एकूण १ हजार ८३७ कोटी रुपयांचा लाभ मिळणार असून, सायंकाळी सहा वाजेनंतर ही रक्कम थेट बँक ▶▶ पान २ वर




# धारूरमध्ये ऊसतोड मजुराला मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुंडगिरी, भाईगिरीचे प्रकरणं कमी होताना दिसत नाहीयेत. संतोष देशमुख, ज्ञानेश्वर मुंढे प्रकरणानंतर बीड जिल्ह्याचं नाव गुन्हेगारीमुळे अख्खा महाराष्ट्रात चर्चेला आले. येथील काय गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला नसल्याचं चित्र येथे तयार झाले आहे. धारूर ▶▶ पान २ वर

## प्रतिक्रिया पाठवा...

# मराठवाडा पत्र चा ५ वा वर्धापन दिन

**आपल्या सर्वांच्या आवडीचे लोकप्रिय दैनिक मराठवाडा पत्र गुरूवार (दि.१९ मार्च २०२६) रोजी पाच वर्ष पूर्ण करत यशस्वीपणे सहाव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे... या पाच वर्षात आपण आम्हाला भरभरून प्रेम दिले... कोरोना महामारी सारख्या भिषण संकट काळात देखील आपण साथ दिली... पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही १९ मार्च रोजी विशेषांक प्रकाशित करत आहोत... या अंकात तुमची प्रतिक्रिया आम्हाला हक्काने हवी आहे... पुढील वाटचालीसाठी आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे बळ आहे... यामुळे आपण खालील ई- मेल आयडीवर किंवा व्हॉट्सअॅप क्रमांकावर प्रतिक्रिया पाठवाव्यात... दै. मराठवाडा पत्र परिवार आपल्या प्रतिक्रिया जानुन घेण्यासाठी उत्सुक आणि आतुर आहे...**

**दि. १७ मार्चपर्यंत आपल्या प्रतिक्रिया पाठवाव्यात. सोबत आपला पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्य पाठवावा... आपल्या बोलक्या प्रतिक्रिया १९ मार्चच्या अंकात आम्हाला प्रसिध्द करायच्या आहेत...**

■ प्रतिक्रीया पाठवण्यासाठी...
व्हाट्सअॅप नं. **9822152955**
ई-मेल: **Email-dailyamarathwadapatra2021gmail.com**

दत्तात्रय नरनाळे
(संपादक : दै. मराठवाडा पत्र)

## मतदारसंघातील महत्त्वाच्या प्रश्नांवर...

# आ.संदीप क्षीरसागर आक्रमक




**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ खरवंडी ते नवगन राजुरी रस्त्यासंबधी आ.संदीप क्षीरसागर यांनी लक्षवेधी मुद्दा उपस्थित करीत या रस्त्याचे काम मागील अनेक वर्षापासून रखडले आहे. हा रस्ता पूर्ण होणार की, नाही ? रस्त्याचे झालेले काम निकृष्ट दर्जाचे असून याची आयआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांची चौकशी करण्याची मागणीही आ.क्षीरसागर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे केली. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ चे काम पूर्ण करण्याचा कालावधी हा १८ महिन्यांचा होता. मात्र ९ वर्ष झाले तरी हा रस्ता अपूर्ण असून, आजही २५ टक्के काम राहिलेले आहे. तसेच या रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ६० टक्क्यांपेक्षा जास्त रकम देण्यात आली आहे. काम रखडण्याचे कारण कोरोना आणि भूसंपादन असल्याचे सांगितले जात आहे. पण कोरोना काळ हा दोन वर्षांचा होता, तर १० टक्के भूसंपादन राहिले आहे. राष्ट्रीय महामार्गाची वर्क ऑर्डर निघण्याआधी पूर्ण होत असते तरीही यात हलगर्जीपणा झाला आहे. १० टके भूसंपादन ९ वर्षात पूर्ण करु न शकणारे अधिकारी, ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# व्यवसाय अडचणीत

आखाती देशात युद्धाची आग धुमसत असल्याने भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायू पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. हॉटेल व्यवसाय तर बंद पडण्याच्या मार्गावर आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याने मुंबईतील २० टक्के हॉटेल्सचे शटर्स खाली आले आहेत. दोन–तीन दिवसांत हे प्रमाण ५० टक्क्यांवर जाईल अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा लक्षात घेता केंद्र सरकारने देशभरात 'एस्मा' म्हणजेच आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायदा लागू केला आहे. देशात गॅसअभावी उद्योग ठप्प होत चालले आहेत, हॉटेल व्यवसाय संकटात आहे, खाद्य तेल महाग होत आहे तसेच इंटरनेट सेवाही ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. एस्मा कायद्याच्या कक्षेत सार्वजनिक संरक्षण, स्वच्छता, जल पुरवठा, रुग्णालये आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संबंधित सेवा येतात. पेट्रोलियम, कोळसा, वीज, पोलाद आणि खनिज उत्पादन तसेच वितरणाशी निगडीत संस्था आणि कंपन्या या कायद्याच्या कक्षेत येतात. याशिवाय बँकिंग सेवाही एस्माच्या कार्यकक्षेत येते. सार्वजनिक वाहतूक, दळणवळण आणि खाद्यपुरवठा खरेदी आणि वितरण संबंधित संस्थांना 'एस्मा' कायद्याचे पालन करणे अनिवार्य असते. गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने 'एस्मा' कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यामुळे आता देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध राहील. देशात कच्च्या तेलाप्रमाणे एलपीजीचा साठा कमी होत चालला आहे. २ ते ३ आठवडेच पुरवठा होऊ शकेल असा अंदाज आहे. गॅस तुटवड्याची झळ हॉटेल्स आणि सर्वसामान्यांना बसू लागली आहे. युद्धामुळे खाद्य तेलाचे दरही वाढत चालले आहेत. आठवडाभरात तेलाच्या दरात मोठी भाववाढ होऊ शकेल. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने हॉटेल आणि खानावळ व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. हे व्यवसाय नियमित गॅस पुरवठ्यावर अवलंबून असल्याने व्यवसाय कसा करावा असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने जागतिक इंधन पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असल्याचे सांगितले जात असले तरी, पेट्रोलियम कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने घरगुती ग्राहकांना करण्याचे निर्देश दिले आहेत. घरगुती सिलिंडरही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने व्यावसायिक सिलिंडर मिळणे कठीण झाले आहे. याचा फटका मोठ्या शहरातील हॉटेल व खानावळ व्यावसायिकांना बसत आहे. जागेचे भाडे, कर्मचा–यांचे पगार, वीज बिल आणि इतर खर्च कायम असताना गॅस पुरवठा कमी झाल्याने व्यवसाय चालवणे अवघड झाले आहे. काही जण इलेक्ट्रिक इंडक्शन, चुली किंवा अन्य पर्यायांचा विचार करत आहेत. मात्र, हे पर्याय महाग असल्याने उत्पादन आणि नफ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. खानावळीत प्रामुख्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी जेवतात. खानावळी बंद झाल्यास या विद्यार्थ्यांना अडचण येऊ शकते. काही खानावळी कमी पदार्थ देणे किंवा चुली–कोळशाचा वापर करून सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, यामुळे शहरातील वायुप्रदूषण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हॉटेल व्यवसायासाठी गॅस अत्यावश्यक आहे. काही दिवस एजन्सीकडून पुरवठा झाला. मात्र, पुढे तो सुरू राहील याची खात्री नाही. इलेक्ट्रिक शेगडीचा पर्याय असला तरी वीज खर्च मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. मध्य पूर्वेतील युद्धामुळे शेअर बाजारात उलथापालथ होत असून डॉलर भडकला आहे. एक डॉलर खरेदी करण्यासाठी ९२ रुपयांपेक्षा अधिक किंमत मोजावी लागत आहे. कच्च्या तेलाचे भाव गगनभरारी मारत असून, ही कळ आणखी काही काळ सोसावी लागेल असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. आजवर त्यांनी दिलेली अनेक आश्वासने फोल ठरली आहेत. जगातील करोडो लोकांना ट्रम्प यांनी प्रथम व्यापारी युद्धात आणि नंतर प्रत्यक्ष युद्धात लोटले आहे. त्याची जबर किंमत सामान्य माणसांना सोसावी लागत आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने घेतला आहे. जागतिक स्तरावर ऊर्जेची किंमत वाढल्यामुळे ही वाढ आवश्यक असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत अद्याप वाढ होणार नसल्याचे सांगण्यात येत असले तरी आज ना उद्या ते दर वाढवावेच लागतील. या सा–या गोष्टींमुळे हॉटेलमधील दर वाढणार असून भाज्या, फळे आणि अन्य सर्व प्रकारच्या वस्तूंची महागाई वाढणार आहे. काही दिवसांनी सरकारला इंधनाचे दर वाढवावेच लागतील. ते टाळायचे असेल तर सरकारला इतर कोणत्याही प्रकारचे कर वाढवावे लागतील. काहीही झाले तरी या युद्धामुळे गोरगरीब आणि मध्यमवर्गाच्या हलाखीत भर पडणार आहे. युद्धपरिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय वाहतुकीवर परिणाम झाला असून भारताच्या खतपुरवठ्याला देखील फटका बसू शकतो. भारत अन्नधान्याबाबत तेलबिया आणि डाळींचा अपवाद वगळता स्वयंपूर्ण आहे. परंतु खतपुरवठ्याबाबत तसे म्हणता येणार नाही. गतवर्षी भारताने एक कोटी टन युरिया आणि ६० लाख टन डीएपी खतांची आयात केली होती. ओमान, कतार, सौदी अरेबिया, यूएई आणि बहरीन येथून भारत युरियाची ७५ टक्के गरज भागवतो. डीएपी प्रामुख्याने सौदी अरेबियातून आणले जाते. भारताला दरवर्षी ३० लाख टन एमओपी(पोटॅश) आयात करावे लागते. कृषी उत्पादनासाठी खतांची मोठी गरज असते आणि त्याबाबत आपली शेती भूराजकीय स्थितीवर अवलंबून असते हे या युद्धामुळे लक्षात येते. युद्धस्थिती आणखी गंभीर झाल्यास भारतातील नैसर्गिक वायू, कच्चे तेल त्याचबरोबर खतांच्या पुरवठ्याला झळ पोहोचू शकते. तसे झाल्यास शेती उत्पादनावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. युद्धामुळे इंटरनेट सेवाही ठप्प होण्याची शक्यता आहे. कारण होर्मुझची सामुद्रधुनी हा एक डिजिटल चेकपॉईंट आहे.

## एकीकडे उष्णतेची लाट,दुसरीकडे विदर्भ,मराठवाड्यामध्ये...

# विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

**पुणे** । वृत्तसेवा

महाराष्ट्रात सध्या उन्हाची तीव्रता कमालीची वाढली असून बहुतांश जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडे आणि उष्ण आहे. किनारपट्टीच्या भागात उकाडा आणि दमटपणा जाणवत असून, काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा प्रभाव आहे. पुढील दोन दिवस पावसाची शक्यता नसली, तरी १३ आणि १४ मार्च रोजी विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघरसह संपूर्ण कोकण पट्ट्यात उष्ण आणि दमट वातावरण कायम राहील. आज पाऊस पडण्याची शक्यता नसून, काही भागांत उष्णतेची लाट जाणवू शकते. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगरमध्ये तापमानाचा पारा वाढला आहे. आज जरी पावसाची चिन्हे नसली, तरी १४ मार्चपासून काही ठिकाणी हलक्या सरी कोसळू शकतात. आज हवामान कोरडे राहील, मात्र १३–१४ मार्चला विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात तापमानात लक्षणीय वाढ होत असल्याची माहिती पुणे वेधशाळेचे शास्त्रज्ञ सखा सानप यांनी दिली आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घराबाहेर पडताना योग्य काळजी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. राज्यात सध्या अकोला जिल्ह्यात सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर पुण्यात आज ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. मुंबईसह समुद्रकिनारपट्टी भागातही तापमानात मोठी वाढ झाली आहे. काही भागांमध्ये पहाटेच्या सुमारास प्रदूषणामुळे धुक्यासारखी चादर पसरलेली दिसून आली. मात्र यामुळे कोणताही धोका नसून नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. विदर्भात तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले आहे. पुढील दोन दिवसांत मुंबई आणि कोकण परिसरात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या गुजरात आणि महाराष्ट्र या भागात प्रतिचक्रवर्ती परिस्थिती निर्माण झाल्यामुळे उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागांत तापमान वाढले आहे. मात्र राज्यात सर्वत्र उष्णतेची लाट नसून विदर्भ आणि कोकणात काही प्रमाणात उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. तसेच १४ मार्चनंतर विदर्भ आणि मराठवाडा या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ही माहिती पुणे वेधशाळेचे हवामानतज्ज्ञ सखाराम सानप यांनी दिली असून याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडून जाणून घेतली.

## अंबाजोगाईत पोलिसांच्या नाकावर टिच्चून फरार आरोपीचे रिल्स!

# हॉटेल व्यावसायिकावरील हल्ल्यातील सूत्रधार अद्याप मोकाट



**अंबाजोगाई** । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक अविनाश मेहता यांच्यावर प्राणघातक हल्ला करून दहशत माजवणारा मुख्य आरोपी राहुल भारत इदगले तीन दिवस उलटूनही पोलिसांना सापडलेला नाही. मात्र, पोलीस यंत्रणेला चकवा देणारा हा आरोपी सोशल मीडियावर उघडपणे रिल्स पोस्ट करून फिर्यादीला धमकावत असल्याने शहरात खळबळ उडाली आहे. शुरुवात तुमने की है, तो माहोल हम भी बना सकते है अशा आशयाचे चिथावणीखोर संवाद असलेले रिल्स आरोपीने बुधवारी दुपारी प्रसारित केले असून, यामुळे अंबाजोगाई शहर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आणि कायद्याच्या धाकावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेची सविस्तर पार्श्वभूमी अशी की, रविवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास मोंढा भागातील मुख्य रस्त्यावर गाडीला बाजू देण्याच्या क्षुल्लक कारणावरून राहुल इदगले आणि त्याच्या साथीदारांनी अविनाश मेहता यांच्यावर लोखंडी रॉड व काठीने भीषण हल्ला केला होता. या हल्ल्यात मेहता गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. केवळ मारहाण करून न थांबता या टोळक्याने मेहता यांच्या 'मेवाड बिस्ट्रो' या हॉटेलवर जाऊन तोडफोड केली आणि सुमारे वीस हजार रुपयांचे नुकसान केले. यावेळी आरोपींनी पोलिसांत तक्रार केल्यास जिवे मारण्याची धमकीही दिली होती. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र घुगे या प्रकरणाचा तपास करत आहेत. घटनेला तीन दिवस उलटूनही मुख्य आरोपी पोलिसांच्या हाताला लागलेला नाही. असे असताना आरोपीने बुधवारी दुपारी स्वतःच्या फोटोवर आक्रमक संवाद असलेले रिल इन्स्टाग्रामवर पोस्ट केले आहे. जो आरोपी पोलिसांना शोध मोहिमेत सापडत नाही, तो सोशल मीडियावर मात्र सक्रिय असल्याचे पाहून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. उघडपणे रिल्स बनवून तो फिर्यादीला अप्रत्यक्षपणे धमकावत असल्याने पोलिसांचा धाक उरला आहे की नाही, असा सवाल सर्वसामान्य विचारत आहेत.

# कड्याच्या शाळेत समाजकंटकाचा धुमाकूळ

**कडा** । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मंगळवारी मध्यरात्री एका अज्ञात व्यक्तीने शिरून धुमाकूळ घातला. या व्यक्तीने आपली ओळख लपवण्यासाठी डोक्यात पिशवी घातली होती. शाळेतील तब्बल आठ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करत चार वर्गखोल्यांची कुलपे फोडल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी सकाळी उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री साडे अकराच्या सुमारास या अज्ञाताने शाळेत प्रवेश केला. बाहेरील आणि वर्गखोल्यातील कॅमेरे फोडून त्याने शासकीय मालमत्तेचे मोठे नुकसान केले. बुधवारी सकाळी शिपाई शाळेत आल्यानंतर हा प्रकार लक्षात आला. मुख्याध्यापक उद्धव सोनवणे यांनी शाळा व्यवस्थापन समितीला याची माहिती दिली. त्यानंतर आष्टी पोलीस ठाण्याचे हवालदार भाऊसाहेब आहेर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.विशेष म्हणजे, दोन वर्षांपूर्वीही याच शाळेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तोडफोड करून टीव्ही चोरीला गेल्याची घटना घडली होती. वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे पालकांमध्ये आणि शिक्षणप्रेमींमध्ये संताप व्यक्त होत आहे. या समाजकंटकाचा उद्देश काय आहे, याचा शोध घेणे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. मुख्याध्यापकांच्या तक्रारीवरून आष्टी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



## पान १ वरून

### शहरातील तीन...

श्री हॉटेल, समाधान हॉटेल आणि रायगड हॉटेल येथे छापा टाकला. तपासणीदरम्यान या हॉटेलमध्ये नफेखोरीसाठी घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे आढळून आले. त्यामुळे तिन्ही ठिकाणांहून सिलेंडर जप्त करण्यात आले. या कारवाईत नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, मंडळ अधिकारी अनिल तांदळे, तलाठी शब्बीर पठाण, तालुका पुरवठा विभागातील अव्वल कारकून श्रीराम वैभव व संतोष मुळीक यांनी सहभाग घेतला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली. पुरवठा विभागाने स्पष्ट केले की गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर अशा कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत. दरम्यान, बीड शहरातील काही मोठ्या हॉटेलमध्येही घरगुती गॅस सिलेंडरचा वापर होत असल्याचे दिसून येत असून बड्या हॉटेल्सवर कारवाई होत नसल्याबद्दल नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. मोठ्या हॉटेलना सूट आणि छोट्या व्यवसायिकांवरच कारवाई अशी प्रतिक्रिया शहरात उमटत असून मोठ्या हॉटेलवरही समान कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. बीड शहरातील बार्शी रोड जालना रोड तसेच सर्व धावे हॉटेलवर घरगुती गॅस सिलिंडरचा सर्रास वापर होत असून घरगुती सिलेंडर वापरणाऱ्या फक्त हॉटेलवर कारवाई न करता संबंधित गॅस एजन्सीवर देखील कारवाई करण्यात यावी अशी देखील मागणी नागरिकात होत आहे.

### वनविभागाचे कृत्रिम...

* कुत्र्यांच्या हल्ल्याचा आणि अपघाताचा धोका : पाण्याच्या शोधात वन्यजीव जंगलाबाहेर पडत असल्याने त्यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच महामार्ग ओलांडताना अज्ञात वाहनांच्या धडकेत वन्यजीवांचा मृत्यू होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. वनविभागाने केवळ नावापुरते पाणवठे न ठेवता त्यात नियमितपणे स्वच्छ पाणी सोडावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी वनविभागाकडे केली आहे.

### पीएम–किसान...

खात्यात वर्ग केली जाईल. केंद्र शासनाने या लाभासाठी भूमी अभिलेख नोंदणी, आधार संलग्न बँक खाते आणि ई–केवायसी या तीन अटींची पूर्तता करणे अनिवार्य केले आहे. राज्यातील पात्र शेतकऱ्यांची संख्या आता ९१ लाखांहून अधिक झाली असून, फेब्रुवारी २०१९ पासून ही योजना राबवली जात आहे. या विशेष सोहळ्याचे थेट प्रक्षेपण राज्यातील ग्रामपंचायती, कृषी विज्ञान केंद्रे आणि बाजार समित्यांमध्ये आयोजित करण्यात आले असून प्रशासनाने सर्व तांत्रिक तयारी पूर्ण केल्याची माहिती कृषी आयुक्तालयाने दिली आहे.

### आ.संदीप क्षीरसागर...

कर्मचारी याला कारणीभूत असल्याच सांगितले आहे. तसच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या मात्र त्याचा मोबदला ही मिळाला नसल्याचे आ. क्षीरसागर यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी या लक्षवेधी सूचनेत सांगताना रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून यापेक्षा पाणंद रस्ता बरा असे सांगत याची आयआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी, यासोबतच हे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आणि कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. यावर मंत्र्यांनी उत्तर देताना भूसंपादन मावेजासाठी केंद्राकडे निधीची मागणी करण्यात आली असून, येत्या मे महिन्यात या रस्त्याचे काम पूर्ण तसेच दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे प्रभारी कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ यांच्याकडे पदवी नसतानाही कार्यकारी अभियंता पदाचा, अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली. याला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्याचीही घोषणा केली. * छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याची उंची वाढवून सुशोभीकरण करण्याची केली मागणी : बीड शहरापासून जाणाऱ्या बायपास रस्त्यावरील महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज पांचा पुतळा उभारण्यात आला आहे. याठिकाणी काही दिवसांत उड्डाणपूल होणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाच्या धर्तीवर या पुतळ्याची उंची वाढवून सुशोभीकरण करण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी याच लक्षवेधी मांडताना केली. याला ही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### धारूरमध्ये ऊसतोड...

तालुक्यातील एक व्हिडिओ व्हायरल झालाय, त्यात एका ऊसतोड मजुराला बागायतदारांकडून मारहाण करण्यात आली आहे. धारूर तालुक्यातील खारेवाडी शिवारात ही मारहाणीची घटना घडली आहे. ऊसाच्या वाढ्यात कांडी का ठेवतो. तुला ऊस नीट तोडता येत नाही, असं म्हणत एका ऊसतोड मजुराला बागायतदाराने लाथा– बुक्की आणि काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली. गणेश बाळासाहेब वाघ अस ऊसतोड मजुराचे नाव आहे. या मारहाणीचा व्हिडिओ समोर आला आहे. यात ऊसतोड मजुराची पत्नी मारू नका नं, असं रडत रडत विनवणी करत होती. पण गुंडगिरी करणारे बागायतदारांना तिच्यावर दया आली नाही. तिच्यासमोरच तिच्या नवऱ्याला लाथाबुक्यानं मारत होते. दरम्यान व्हायरल झालेल्या ऊसतोड मजुराच्या मानेवर पाय दिल्याचेही व्हिडिओमध्ये दिसत आहे. दरम्यान ऊसतोड मजूर कुटुंब दहशतीखाली आहे.पत्नी आणि भाऊ वाचवण्यासाठी गेले असता त्यांनाही मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गब्बू खाडे, श्रीकांत खाडे, अजय वसंत खाडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी झालेल्या ऊसतोड मजुरावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. बीडच्या धारूर तालुक्यातील खारेवाडी शिवारात घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली आहे.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



बीड जिल्ह्यातील व आंबेजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील ग्रामपंचायतीचा सशक्त पंचायत नेत्री राष्ट्रीय संमेलन,पंचायत राज्य मंत्रालय नवी दिल्ली येथील कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातून एकमेव ग्रामपंचायतची निवड झालेल्या बर्दापूर येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ अनितातार्ई विकास मोरे पाटील या नवी दिल्ली येथील कार्यक्रमासाठी नुकत्याच दाखल झाले आहेत. केंद्र सरकारच्या वतीने नवी दिल्ली येथे महिला लोकप्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे देशातील विविध राज्यांमधून निवड करण्यात आलेल्या लोकप्रतिनिधींना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले असून बीड जिल्ह्यातील व आंबेजोगाई तालुक्यातील बर्दापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ मोरे पाटील यांना हा राष्ट्रीय परिषदेमध्ये भाग घेण्याचा सन्मान मिळाला आहे सरपंच सौ मोरे पाटील यांनी ग्रामपंचायतीच्या व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून विविध योजनांचे आयोजन करून विकास कामावर भर दिल्याने ती कामे मार्गी लावण्यात आली आहेत तसेच बीड जिल्ह्यातील व आंबेजोगाई तालुक्यातील महिला स्नेही व बालिका स्नेही या योजनेअंतर्गत महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन बीड जिल्ह्यात व मराठवाड्यात आपल्या ग्रामपंचायतीचे व गावचे नाव उज्वल ठेवण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्न करत आहेत गावातील पायाभूत सुविधांसाठी त्या सातत्याने लक्ष ठेवून असल्याने व सामाजिक उपक्रमात अग्रेसर राहून त्यांनी हा बहुमान मिळवला आहे. राष्ट्रीय स्तरावर सरपंचाने प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही आपल्या गावासाठी व तालुक्यासाठी अभिमानाची अभिमानाची बाब आहे या माध्यमातून ग्रामीण भागातील विविध समस्यांचे व विकास कामांचे महत्त्व मांडण्यासाठी ही संधी मिळाली असल्याची प्रतिक्रिया सरपंच सौ अनिता ताई विकास मोरे पाटील यांनी व्यक्त केली आहे हा कार्यक्रम दिनांक ११ मार्च रोजी डॉक्टर आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर नवी दिल्ली येथे नुकताच संपन्न झाला दरम्यान या निवडीबद्दल गावातील नागरिकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# फार्मर आयडी मधील तांत्रिक त्रुटी महिनाभरात दुरुस्त होणार

## आ. विजयसिंह पंडित यांच्या लक्षवेधी सूचनेला कृषी मंत्र्यांचे उत्तर

**मुंबई। प्रतिनिधी**

फार्मर आयडी हा शेतकऱ्यांचा एकमेव ओळख क्रमांक असून शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ घेण्यासाठी तो महत्वाचा आहे. फार्मर आयडी ची नोंदणी करताना शेतजमीनीच्या क्षेत्रातील तफावत, गट क्रमांक, नावातील चुका, गावाच्या नावातील बदल यांसह अनेक तांत्रिक त्रुटी झाल्यामुळे हजारो शेतकरी शासन योजनांच्या रास्त लाभापासून वंचित आहेत. वांरवार तक्रारी देऊनही फार्मर आयडी मधील त्रुटींची दुरुस्ती होत नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे गऱ्हाणे आ. विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून थेट विधानसभेत मांडले. कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय बैठक घेऊन एक महिन्यात फार्मर आयडी मधील तांत्रिक त्रुटी दुरुस्त करून दिल्या जातील असे आश्वासन दिले आहे. नादुरुस्त फार्मर आयडीमुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत.

सन २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात फार्मर रजिस्ट्री पायलट प्रोजेक्ट राबविण्यात आला, पायलट प्रोजेक्ट राबविताना शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या फार्मर आयडीमध्ये मोठ्या प्रमाणावर तांत्रिक चुका झाल्या, अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र १.९९ हेक्टर नोंद झाले परिणामी नादुरुस्त फार्मर आयडीमुळे अनेक शेतकऱ्यांना शासन योजनांच्या रास्त लाभापासून वंचित रहावे लागले. फार्मर आयडी दुरुस्त करणे संदर्भात सर्वाधिक तक्रारी गेवराई



विधानसभा मतदार संघातून येत होत्या. आ. विजयसिंह पंडित यांनी याप्रकरणी पुढाकार घेऊन तहसिल आणि जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका घेतल्या, स्थानिक स्तरावर फार्मर आयडीमधील त्रुटी दूर करण्याची यंत्रणा नसल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे राज्याच्या जमाबंदी आयुक्तांकडे या बाबत सविस्तर माहिती दिली. तरीही शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांनी हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला.

आ. विजयसिंह पंडित यांनी या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी करताना शासनाच्या महा डीबीटी वरील सर्व योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पिक विमा, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसान, कर्जमाफी यांसह शासनाच्या ई-सेवासाठी फार्मर आयडीचा उपयोग होत असल्याचे सांगितले. शासन योजनांचा लाभ घेण्यासाठी क्षेत्र मर्यादा २ हेक्टर असल्यामुळे आणि फार्मर आयडीमधील चुकीच्या नोंदीमुळे सुमारे २ लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवर १.९९ हेक्टर क्षेत्राची नोंद झाल्यामुळे हे शेतकरी शासन योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. फार्मर आयडी दुरुस्त करण्याची सुविधा तालुकास्तरावर करा, ग्री स्टॅक प्रणालीमध्ये नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांच्या संदर्भाने तक्रारींचा निपटारा लवकर करा, गट नंबर, गाव तालुक्यातील बदल, मोबाईल नंबर दुरुस्त करणे आदी लहान-सहान बदलांबाबतचे अधिकार तलाठी किंवा कृषी सहाय्यक यांना द्या, फार्मर आयडीमधील दोषमुक्त करण्यासाठी विशेष अभियान राबवून तालुकास्तरावर वेगळा संगणक कक्ष उभारा अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न लक्षवेधीच्या माध्यमातून आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केल्याचे सांगताना राज्याचे कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी याप्रकरणी महिनाभरात बीड जिल्ह्यातील विशेषतः गेवराई विधानसभा मतदार संघातील फार्मर आयडीच्या दुरुस्ती करणार असल्याचे आश्वासित केले. जमाबंदी आयुक्त, ग्री स्टॅकचे संचालक, तंत्रज्ञ आणि सेंट्रल प्रोजेक्ट मॉनिटरींग युनिटची टिम यांच्यासोबत आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थित बैठकीचे आयोजन करून सर्व फार्मर आयडी दुरुस्त करून दिले जातील असे त्यांनी सांगितले. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आणि जिव्हाळ्याच्या प्रश्नाला सभागृहात वाचा फोडून या बाबत कार्यवाहीचे आश्वासन मिळवून दिल्याबद्दल शेतकऱ्यांनी आ. विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर लिंबागणेश येथे उत्साहात संपन्न

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; शेकडो लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान टप्पा - १ अंतर्गत लिंबागणेश येथे १ मार्च बुधवारी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान सभामंडपात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे . लिंबागणेश येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष



स्वरूप दिले असल्याचे चित्र पाहायला मिळाले .

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन ) शैलेश सूर्यवंशी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले . कार्यक्रमास राजेंद्र मस्के , बळीराम गवते , डॉ . गणेश ढवळे , गोरखनाथ सिंगर तसेच महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . यामध्ये निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , निवडणूक नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर , उपाधीक्षक भूमि अभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते . लिंबागणेश महसूल मंडळातील २२ गावचे सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य तसेच महिला बचत गट , शेतकरी गट , विद्यार्थी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले .

शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा ( मयत खातेदार कमी करणे ) , डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग - १ ते वर्ग - २ रूपांतर , ई - पिक पाहणी , ग्रीस्टॅक नोंदणी , ई - वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे , ई - केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प , ई - शिधापत्रिका वाटप , लक्ष्मी मुक्ती योजना लाभ , रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली .

या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या . त्यामध्ये २७६० डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप करण्यात आले . तसेच २१० डिजिटल शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले . महसूल विभागाशी संबंधित ६० फेरफार प्रकरणांचा निपटारा करण्यात आला . विविध योजनांअंतर्गत २७२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . याशिवाय १३४ मोफत बस पासचे वितरण करण्यात आले . १८१ आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले . तसेच २२२ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली .संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना लाभार्थ्यांसाठी या शिबिरात विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती . लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र ऑनलाईन करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अनेक वृद्ध नागरिकांना मोठा दिलासा मिळाला या शिबिरामुळे महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले . अनेक शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या . अधिकाऱ्यांनी त्या समस्यांवर मार्गदर्शन करून काही प्रकरणे जागेवरच निकाली काढली . त्यामुळे नागरिकांना तालुका कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की महाराष्ट्र शासनामार्फत ही अत्यंत महत्त्वाची योजना नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेली आहे .



*नांदेड : श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे, तसेच संस्थेतील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी ड्रामा क्लबच्या वतीने एकांकिका सादर करण्यात आली, ज्यास उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. मनेश कोकरे यांनी महिला दिनाचे महत्त्व अधोरेखित करत समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी महिलांचा सन्मान राखून त्यांच्या सक्षमीकरणासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.*

# मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत आंतरराष्ट्रीय व्याख्यानाचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

मौजे पाली येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत राष्ट्रीय आविष्कार अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विज्ञान आणि अध्यात्म या विषयावर आंतरराष्ट्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, माउंट आबू येथील संचालिका राजयोगिनी बीके प्रज्ञा दीदी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लाड सर होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागताने करण्यात आली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बीके प्रज्ञा दीदी यांनी विज्ञान आणि अध्यात्म यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम स्पष्ट केला. आधुनिक विज्ञानामुळे मानवी जीवनात अनेक सोयीसुविधा निर्माण झाल्या असल्या तरी मानसिक शांतता, सकारात्मक विचार आणि नैतिक मूल्ये जपण्यासाठी अध्यात्माची आवश्यकता तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच चांगले संस्कार, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासल्यास जीवनात यश निश्चित मिळते, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी शब्दांत सांगितले. या प्रसंगी उषा बहिणजी, मिसाळ सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमासाठी शाळेतील काब्दे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, खाडे मॅडम, जाधव मॅडम, सोनवणे मॅडम, वाकचौरे मॅडम, सांगळे मॅडम तसेच पायके सर, आघाव सर, राठोड सर, तळेकर सर, सोळुंके सर, साबळे सर, डोंगर सर आदी शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून विषय अधिक समजून घेतला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मनीषा मुंडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजेंद्र राठोड सर यांनी व्यक्त केले.


## जाहीर प्रगटन

### तहसिल कार्यालय बीड (संकीर्ण विभाग)

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात सुनावणी नोटीस**
Email-tahasilbeedgmail.com, दुरध्वनी: ०२४४२-२२२९०२
क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/कावी- १२८/२०२६
दिनांक ११/०३/२०२६

प्रति, मुख्याध्यापक प्राचार्य
**श्री रामकृष्ण महाराज विद्यालय, विडा, ता. केज जि. बीड**

विषय :- जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ नुसार आपले शाळेचे /महाविद्यालयाचे खोटी/चुकीची कागदपत्रे सादर करुन प्रशासनाची दिशा भूल करून जन्म प्रमाणपत्र मिळविणाऱ्या लाभार्थी यांचे बाबत सोबत जोडलेले (निर्गम/टीसी ) तपासून अहवाल तात्काळ सादर करणे बाबत.

संदर्भ :- १. भारत राजपत्र सी.जी. डी. एल. अ. (१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगष्ट ११,२०२३ श्रावण शके २०.१९.४५ (शक) विधी व न्याय मंत्रालय (कायदा विभाग) यांचेकडील शासन आदेश निर्देश परिपत्रक व व्याप्ती निर्देशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे.

२. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र २०२३/आरबी-डेस्क-१ /पोल-१/ जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-२०२३ दिनांक १३.१०.२०२३

वरिल संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, बीड तालुक्यामध्ये **निर्गम- १७९६ दि. १५/०१/२०२६ राधा रामप्रसाद डोईफोडे** यानी जन्म-मृत्यु प्रमाणपत्र मिळवणे करिता आपले कार्यालयाचे शाळेचे/ महाविद्यालयाचे कागदपत्रे (निर्गम/टी सी) जोडुन या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

करिता या सोबत अर्जदार यांचे आपले कार्यालयाचे / शाळेचे / महाविद्यालयाचे कागदपत्रे (निर्गमाटी, सी) तपासणी (verfication) करून सदरिल कागदपत्रे आपले कार्यालयाचे / शाळेचे महाविद्यालयाचे आहेत किंवा कसे या बाबत स्पष्ट अहवाल स्वत तहसीलदार बीड यांचे समक्ष हजर राहुन या कार्यालयास तात्काळ सादर करावा विलंबाची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घ्यावी.

सोबत -आपले कार्यालयाचे शाळेचे महाविद्यालयाचे कागदपत्रे (निर्गम/टी. सी.)

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
(चंद्रकात शेळके)
**तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिल कार्यालय बीड (संकीर्ण विभाग)

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात सुनावणी नोटीस**
Email-tahasilbeedgmail.com, दुरध्वनी: ०२४४२-२२२९०२
क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यू नोंद/कावी- १२८
दिनांक //२०२६

प्रति, ३. मुख्या अधिकारी न.प.
४. ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय ईट/ गंगानाथवाडी ता बीड
विषय :- जन्मू नोंद प्रस्ताव संदर्भाने जाहीर नोटीस प्रसिध्द करणेबाबत
श्री. रामप्रसाद श्रीरंग डोईफोडे

संदर्भ :- १. भारत राजपत्र सी.जी. डी. एल. अ. (१२०८२०२३-२४८०४४ नवी दिल्ली शुक्रवार ऑगष्ट ११,२०२३ श्रावण शके २०.१९.४५ (शक) विधी व न्याय मंत्रालय (कायदा विभाग) यांचेकडील शासन आदेश निर्देश परिपत्रक व व्याप्ती निर्देशान्वये या न्यायालयात प्रकरण चालविण्याचा अधिकार आहे.

२. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश क्र २०२३/आरबी-डेस्क-१ /पोल-१/ जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-२०२३ दिनांक १३.१०.२०२३

उपरोक्त विषयी या न्यायालयात श्री श्रीम अधिवक्ता अँड.. यांनी वकीलपत्रासह अर्जदार श्री. रामप्रसाद श्रीरंग डोईफोडे रा. ईट ता. बीड यांचे वतीने विषयासंदर्भात प्रास्ताव दाखल केला आहे.

याद्वारे थोडक्यात असे की, श्री/श्रीम. राधा रामप्रसाद डोईफोडे यांची आपले कार्यालयाचे दप्तरी जन्म नोंद नोंदवहीमध्ये अनुपलब्ध असलेबाबत आपले कार्यालयातुन दिनांक १६/०१/२०२६ रोजी प्रमाणपत्र दिले आहे.

त्याअनुषंगाने आपलेमार्फत हे जाहिरप्रगटन प्रसिध्द करुन सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांनी **राधा रामप्रसाद डोईफोडे यांचे दिनांक ३०/१२/२००९** रोजीची जन्म नोंद नोंदवहीमध्ये घेण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हवा जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद दिनांक ३०/१२/२००९. घेण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी

सदरील नोटीस आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर डकवून पंचनामा प्रत या कार्यालयास सादर करावी.आज दिनांक //२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख / १२०२६ ही आहे.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १२८/२०२६**
**रामप्रसाद श्रीरंग डोईफोडे विरुध्द ग्रा.पं.कार्या.ईट/ गंगानाथवाडी**

**पहा,**
**१. रामप्रसाद श्रीरंग डोईफोडे, रा. ईट, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक राधा रामप्रसाद डोईफोडे यांचा दिनांक ३०/१२/२००९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्म ची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहे **ईट/ गंगानाथवाडी** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **ईट/ गंगानाथवाडी** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०३/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०४/२०२६ ही आहे.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २८/२०२६**
**जयराम दत्ताराय शिंदे विरुध्द ग्रा.पं.कार्या.चौसाळा**

**पहा,**
**१. जयराम दत्ताराय शिंदे, रा.चौसाळा बीड, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत दत्तात्रय निर्वत्ती शिंदे यांचा दिनांक १९/१२/२०२३ रोजी मृत्यू झालेला** असून त्यांचे मृत्यू नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्म ची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास आहे **चौसाळा** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्राम पंचायत कार्यालय मौजे **चौसाळा** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०९/०४/२०२६ ही आहे.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार, बीड.**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार दि. १३ मार्च २०२६ ●

## थोडक्यात...

### साडेचार वर्षांच्या चिमुकलीने पूर्ण केला आयुष्यातील पहिला उपवास



**तलवाडा । प्रतिनिधी**

लहान मुलांचे हट्ट सहसा खेळणी किंवा खाऊसाठी असतात. मात्र गेवराई येथील फॅशन टेलर शेख मजहर यांची नात व खालिद कुरेशी यांची अवघ्या साडेचार वर्षांची मुलगी ईसरा या चिमुकलीने उपवास ठेवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या चिमुकलीने रमजान निमित्त आपल्या आयुष्यातील पहिला उपवास अत्यंत उत्साहाने आणि निर्धाराने पूर्ण केला आहे. घरातील मोठ्या व्यक्तींना उपवास करताना पाहून या चिमुकलीलाही उपवास करण्याची इच्छा झाली. साडेचार वर्षांचे वय असताना उपवास झेपेल का, अशी शंका पालकांच्या मनात होती. मात्र, तिने सकाळपासूनच काहीही न खाता दिवसभर घरच्यांन सोबत नमाज पठण व इतर कार्यात सहभाग घेतला. दिवसभर तिने १२ते१३तास पाण्याचा एक ही घोट न घेता आपला संकल्प पूर्ण केला. चिमुकलीने दिवसभरात चॉकलेट, बिस्किटे किंवा इतर आवडीचे पदार्थ समोर असूनही तिने माझा आज उपवास आहे, असे सांगत ते खाण्यास नकार दिला. तिच्या या कृतीने कुटुंबासह परिसरातील नागरिकही थक्क झाले आहेत. तिच्या पालकांनी सांगितले की, आम्हाला वाटले होते ती दुपारी भूक लागली की जेवेल, पण तिची जिद्द पाहून आम्ही थक्क झालो. तिच्या या श्रद्धेचे आणि संयमाचे आम्हाला खूप कौतुक वाटते. आजच्या आधुनिक काळात जिथे लहान मुले खाण्यापिण्याच्या बाबतीत खूप हट्टी असतात, तिथे एका साडेचार वर्षांच्या मुलीने दाखवलेली ही शिस्त आणि भक्ती कौतुकास्पद ठरत आहे. इसरा ने सायंकाळी ६ वाजुन३८ मिनीटांनी आपला उपवास सोडला. सध्या या चिमुकलीच्या पहिल्या उपवासाची चर्चा राज गल्ली परिसरात मोठ्या उत्साहाने चर्चिली जात आहे.

### पिंपळनेर परिसरात लिंबूची मागणी वाढली




**पिंपळनेर । प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने आता किरकोळ बाजारात लिंबूची मागणी चांगलीच वाढली आहे. या मागणीच्या तुलनेत लिंबाची आवक मर्यादित होत असल्याने लिंबूचे दर वाढले असून सध्या किरकोळ बाजारात २ लिंबूसाठी ग्राहकाला १० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे आता किरकोळ बाजारात लिंबू भाव खाताना दिसत आहे. दरम्यान, पावसाळा सुरू होईपर्यंत लिंबाचे दर चढेच राहणार असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. गेल्या तीन आठवड्यांपासून तापमानात कमालीची वाढ जाणवत आहे. होळी झाल्यावर तर उन्हाचा तडाखा आणखीनच वाढला आहे. पुढील दोन महिन्यांत वातावरणातील तापमान आणखीन वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढणाऱ्या उष्णतेने बाजारात थंड सरबते, फळांचे रस यांना मागणी वाढली आहे. त्यात लिंबाच्या सरबताना मोठी मागणी आहे. शिवाय रोजच्या जेवणात हीअनेक लोक लिंबाचा वापर करत असल्याने सध्या बाजारात लिंबांना मागणी आहे. त्यामुळे मागणीत झालेली वाढ पाहता दर वाढल्याचे नाळवंडीचे व्यापारी राऊत डिगांबर यांनी सांगीतले आहे.

## प्रत्येक क्रांतीच्या माघे आईच असते: महंत राधाताई महाराज सानप आईसाहेब

**आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद: प्राजक्ताताई धस ; युवा पत्रकार संघाच्या वतीने राज्यस्तरीय ४३ नारी सन्मान पुरस्कारांचे वितरण**

**आष्टी । प्रतिनिधी**

प्रत्येक क्रांतीच्या माघे आईच असते. जन्मापासून प्रत्येक यशोगाथेमागे आईचे योगदान महत्त्वाचे असते. आईनेच मुलींना चांगले संस्कार द्यायला हवेत. सध्याच्या काळात शिक्षणामुळे अनेक महिला विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. मात्र, तरीही तळागाळातील महिला अजूनही प्रगतीपासून दूर आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महंत राधाताई महाराज सानप (आईसाहेब) यांनी केले.

आष्टी येथील पंचायत समिती सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस यांनी सांगितले की, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच सामाजिक कार्यात आघाडीवर असतो. गेल्या ७ वर्षांपासून सातत्य राखत जागतिक महिला दिनानिमित्त कर्तबगार महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्याचे कार्य ते करीत आहेत. यामुळे महिलांना प्रेरणा मिळत आहे. युवा पत्रकार संघाचे हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय नारी सन्मान २०२६ पुरस्कारांचे वितरण गुरूवार दि १२ मार्च रोजी करण्यात आले. यामध्ये विविध क्षेत्रातील ४३ कर्तबगार महिलांचा समावेश होता.



पुढे बोलताना अध्यक्ष प्राजक्ताताई धस म्हणाल्या, आज महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. आपल्या कार्याचा ठसा उमटवीत त्या पुढे जात आहेत, याचा मला सार्थ अभिमान आहे. प्रत्येक स्त्रीने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका सिंघण, सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, सरपंच वंदनाताई गायकवाड, शालिनीताई मुळे, प्रतिभाताई थोरवे, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्षा विद्याताई चव्हाण, आशा कारंडे, वर्षाताई शिंदे, डॉ.सविता जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक प्रल्हाद तळेकर यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष अविनाश कदम व पत्रकार समीर शेख यांनी तर आभार सचिव गहिनीनाथ पाचबैल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अविनाश कदम, सचिव गहिनीनाथ पाचबैल, उपाध्यक्ष जावेद पठाण,ज्येष्ठ पत्रकार निसार शेख, संतोष दाणी, पत्रकार समीर शेख,संतोष नागरगोजे, राजेंद्र लाड,अक्षय विधाते,सोपान पगारे, प्रेम पवळ,संस्कार लाड, विठ्ठल राख, सचिन पवार, किरण शिनगिरे,ओंकार कदम, सुरज शिंदे, दिपक उंबरकर,अर्थव डाडर यांनी परिश्रम घेतले.

### नारी सन्मान पुरस्काराने यांचा झाला सन्मान

**महंत राधाताई महाराज सानप (आईसाहेब) – आदर्श कीर्तनकार व समाज प्रबोधनकार (महासांगवी संस्थान पाटोदा), सौ. सुशिला साहेबराव चव्हाण – आदर्श माता (मुर्शदपूर, आष्टी), डॉ. आम्रपाली मोहिते – आदर्श समाज सेविका (पुणे), कु. श्रावणी आजिनाथ दळवी – आदर्श खेळाडू (१९ वर्षीय महाराष्ट्र क्रिकेट, रुईनालकोल), डॉ. स्नेहा विशाल हरकर – आदर्श डॉक्टर (कडा), डॉ. सुपर्णा देशमुख – आदर्श प्राध्यापिका/लेखिका (कडा), डॉ. सिमा सतीश काटकर – आदर्श समाज सेविका (वडापुरी, ता. इंदापूर), मुबिना जावेद शेख – आदर्श सरपंच (शेडाळा, ता. आष्टी), ॲड. सारिका बालासाहेब कुलकर्णी – आदर्श विधिज्ञ (बीड), रेणुका चेतन वराडे/सानप – आदर्श सामाजिक कार्यकर्ती (अहिल्यानगर), उझमा सलीम शेख – आदर्श पोलीस अधिकारी (आष्टी), निकिता बाबासाहेब पोकळे – आदर्श बास्केटबॉल खेळाडू (कडा), प्रज्ञा सुभाष मुनेश्वर – आदर्श ग्रामपंचायत अधिकारी (भाळवणी/हाजीपूर), आशा वैजनाथ फड – आदर्श लेखिका (शेवगाव), प्रियंका सचिन विधाते – आदर्श प्राचार्य (सियाज प्रीस्कुल, आष्टी), सुविद्या विशाल चौधरी – आदर्श लेखिका/शिक्षिका (झगडेवाडी, ता. दौंड), कांचन प्रमोद आहेर/बिडवे – आदर्श महिला आरोग्यस्वस्थ नारी (अहिल्यानगर), रेखा संतोष कणसे – आदर्श कर्तृत्ववान माता (वटणवाडी, ता. आष्टी), भक्ती गणेश गिरी – शिवचरित्रकार (कासरी, ता. आष्टी), सुनिता गंगाधर वेडे – आदर्श ग्रामपंचायत अधिकारी (साबडखेड, ता. आष्टी), राजश्री शिंदे – आदर्श कलाकार (पुणे), मिनाज सिकंदर शेख – आदर्श शिक्षिका (आष्टी), प्रियंका महेश टांगळ/फसले – आदर्श अभियंता (दौलावडगाव, ता. आष्टी), प्रिया मंगेश होळकर – आदर्श अंगणवाडी सेविका (धानोरा, ता. आष्टी), संगिता भानुदास जाधव – आदर्श शिक्षिका (आश्रमशाळा सुरुडी, ता. आष्टी), ज्योत्स्ना शारदाबाई मुसळे – आदर्श ग्राममहसूल अधिकारी (वाळुंज, ता. आष्टी), म्हसोबा महिला शेतकरी बचत गट – आदर्श महिला गट (पारोडी, ता. आष्टी), उज्वला केशवराव बोर्डे – आदर्श सहाय्यक कृषी अधिकारी (जळगाव, ता. आष्टी), मुग्धा भैरवनाथ काशीद – आदर्श कवयित्री (कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर), डॉ. मेघा संतोष डहाळे – आदर्श सामाजिक कार्यकर्ती (अहिल्यानगर), सरिता मारुती जगताप – आदर्श महिला संगीत विशारद (अहिल्यानगर), सुनिता जनक पोकळे/शिंदे – आदर्श महिला तबला संगीत विशारद अलंकार (आष्टी), स्वाती नानासाहेब पोकळे – आदर्श महिला ग्रामसखी (बेलगाव, ता. आष्टी), सुरेखा बबन सदाफुले – आदर्श महिला आरोग्य सेविका (मातकुळी, ता. आष्टी), सायली अनंत चौधरी/हंबर्डे – आदर्श प्राध्यापिका (आष्टी), सुवर्णा मच्छिंद्र गावडे – आदर्श महिला आशा वर्कर (क–हेवडगाव), सुमित्रा कल्याण काळे – आदर्श महिला महसूल सेवक (आष्टी), अलका बाबुराव ससाणे – आदर्श महिला सुपरवायझर (धामणगाव, ता. आष्टी), श्रावणी सोमनाथ पवळ – उत्कृष्ट चेंग ब्युटी मेकअप आर्टिस्ट (कडा, ता. आष्टी), रुपाली तुकाराम ढोबळे – आदर्श महिला लाईनमन (धानोरा, ता. आष्टी), सिमाबेगम जावेद सय्यद – आदर्श महिला उद्योजिका (मुर्शदपूर, ता. आष्टी), अस्मिता अतुल सुरवसे – आदर्श महिला गायिका (बीड), कविता माणिकराव पानसरे – प्राथमिक शिक्षिका (आश्रमशाळा सुरुडी) यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.**

## वन्यजीव धोक्यात : वनविभागातील कृत्रिम पाणवठे कोरडे ; वन्यप्राण्यांची वस्तीकडे धाव

**बीड । प्रतिनिधी**

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नैसर्गिक पाणीस्रोत असलेल्या तलाव, साठवण तलाव आणि धरणांतील पाण्याची पातळीही मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी परिसरातील वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडे पडले आहेत. यामुळे हरीण, मोर, लांडोर, वानर आदी वन्यजीवांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असून ते पाण्याच्या शोधात मानवी



वस्तीकडे तसेच गाव तलावांकडे धाव घेत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

वनविभागाने तयार केलेले अनेक कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडले असून त्यामध्ये नियमितपणे पाणी सोडले जात नाही. काही ठिकाणी महिनाभरापूर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने ते पाणी पिण्यास अयोग्य झाले आहे. पवन्यजीव पाण्यासाठी मानवी वस्तीकडे येत असल्याने त्यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ले होण्याचा तसेच अज्ञात वाहनांच्या धडकेत जीव गमावण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे वनविभागाने कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमितपणे स्वच्छ पाणी सोडून वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

## मारु नका ना वंऽऽ पत्नीची विनवणी तरीही ऊसतोड मजुराला बेदम मारहाण, व्हिडिओ व्हायरल

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर मारहाणीच्या घटना बीड जिल्ह्यात नेहमीच घडत असल्याचं व त्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्याचं पाहायला मिळतं. असाच एक ऊसतोड कामगाराला बागायतदाराकडून मारहाण झाल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. ही घटना धारूर तालुक्यातील खारेवाडी भागात घडली. ऊसतोड कामगाराला बेदम मारहाण करत असताना मारू नका ना वं असं म्हणत आक्रोश करताना दिसून येत आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

गणेश बाळासाहेब वाघ असं ऊसतोड कामगाराचं नाव आहे.



धारूर तालुक्यातील खरेवाडी येथे उसाच्या वाड्याला कांडी का ठेवली असं म्हणत चार ते पाच जणांनी गणेश वाघ याला काठी लाठ्यासह बेदम मारहाण केली. या मारहाणीचा धक्कादायक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे. या व्हायरल व्हिडिओत आरोपींनी गणेश वाघच्या नरड्यावर पाय दिल्याचं दिसत आहे. मारहाण होत असताना त्याची पत्नी मारू नका ना वं असं म्हणून ओरडताना देखील ऐकू येत आहे. याप्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात गब्बू खाडे, श्रीकांत खाडे, अजय वसंत खाडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी ऊसतोड कामगाराच्या भावाला व पत्नीला देखील मारहाण झाल्याचं पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे.खारेवाडी भागात घडलेल्या मारहाणीच्या घटनेत ऊसतोड कामगार गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेमुळे ऊसतोड कामगाराचं संपूर्ण कुटुंब प्रचंड घाबरलेलं आहे. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पुन्हा एकदा बीड चर्चेत आले असून पोलिसांचा धाक राहिला नसल्याचं बोललं जात आहे.

## के.एस.पी. विद्यालय येथे पालक मेळावा व स्नेह भोजन कार्यक्रम उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

के.एस.पी. विद्यालय, कालिका नगर, बीड येथे दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी पालक मेळावा व स्नेह भोजनाचा साजरा करण्यात आला. शैक्षणिक वर्षाच्या अखेरेस पालकांना आपल्या लाडक्या पाल्या विषयीची प्रगती व सुधारणा या विषयी चर्चा करण्यास यावी या हेतुने हा पालक मेळावा साजरा करण्यात आला. जेव्हा शिक्षक आणि पालक एकत्र येतात, तेव्हा विद्यार्थ्याच्या घराकडे आणि शाळेतील अशा दोन्ही बाजूंचा विचार होतो. यामुळे मुलांच्या मानसिक आणि शैक्षणिक विकासाला योग्य दिशा मिळते. मेळाव्यामुळे पालकांचा शाळेवर आणि शिक्षकांवर विश्वास वाढतो. शाळा ही केवळ अभ्यासाची जागा नसून ती मुलांच्या भविष्यासाठी काम करणारी संस्था आहे, ही भावना दृढ होते. पालकांना मुलांच्या अभ्यासाची पद्धत समजल्यामुळे, ते घरीदेखील मुलांकडून योग्य प्रकारे अभ्यास करून घेऊ शकतात.

## शांताई अर्बनमध्ये विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचा गौरव

**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त शांताई अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बीड येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे यांच्या संकल्पनेतून सन्मान स्त्री शक्तीचा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जागतिक महिला दिन साजरा करत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून शेवतांबरी घाडगे दैनिक कार्यारंभ व सौ. प्रियांका गोरे यांची उपस्थिती लाभली. गोरे यांनी आपल्या मनोगतात महिलांनी शिक्षण, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबनाच्या बळावर समाजात मोठे स्थान निर्माण केले असल्याचे



सांगितले. महिलांच्या सन्मान, संरक्षण आणि सक्षमीकरणासाठी समाजाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत डॉ.डी.बी.शिंदे यांनी शांताई अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटीच्या विविध उपक्रमांची माहिती देत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. महिलांना आर्थिक पाठबळ देऊन स्वावलंबी बनविण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रमुख पाहुण्यांनीही शेवतांबरी घाडगे यांनी शांताई अर्बनच्या सामाजिक व महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिला दिन म्हणजे केवळ एक दिवस किंवा शुभेच्छांचा वर्षाव नव्हे, तर हा दिवस स्त्रीशक्तीचा, तिच्या त्यागाचा आणि जिद्दीचा सन्मान करण्याचा आहे. पूर्वीच्या काळी स्त्रीला केवळ चार भिंतींच्या आत मर्यादित मानले जात होते; मात्र आज जिजाऊ, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, कल्पना चावला यांसारख्या महान स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने महिलांची क्षमता सिद्ध केली आहे. संधी मिळाल्यास महिला कोणतीही उंची गाठू शकतात आणि त्यांच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी शांताई अर्बन नेहमीच पाठबळ देत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांचा सन्मान केवळ एका दिवसापुरता न ठेवता वर्षभर केला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात डॉ. स्वप्नजा पिंगळकर (डेंटल सर्जन, बीड), सौ. अपर्णा शिरसागर (गुरुकुल शिक्षिका, बीड), सौ. अनिता शिंदे (आरोग्यसेविका), सौ. वैशाली शिंदे (ब्युटिशियन, बीड), श्रीम. मनीषा टाकळकर (कर्मचारी पतसंस्था, बीड), डॉ. वर्षा तिडके (तिडके हॉस्पिटल, बीड), सौ. ज्योती पिंगळे (नगरसेविका, बीड), सौ. देवशाला शिंदे (चंपावती विद्यालय, शिक्षिका), सौ. रोहिणी कुटे (अध्यक्ष, संस्कृती सेवाभावी संस्था) व सौ. दुर्गा राऊत(योगा शिक्षिका) यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे, उपाध्यक्ष वाघमारे सर, संचालक शुभांगी शिंदे, ज्योती वाघमारे, परमेश्वर शिंदे, शाखा व्यवस्थापक आरती कुलकर्णी, आकाश गाडे, शिवा शिंदे, साक्षी मॅडम तसेच संचालक मंडळ, सर्व सभासद, पिग्मी एजंट, खातेदार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला असून सर्वांनी महिलांच्या शक्तीचा सन्मान केला.